सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 1704
दिनांक :- 22 JUN 2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र पदवीका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :- :-** १. आपले परिपत्रक क्र. :-१०/एडीएम/Intake Approval/२०२३/४४४ दिनांक १३ जून २०२३.
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/२०२३/१६५२ दिनांक १४ जुन २०२३.
३.तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या कार्यालयाशी दिनांक २२/६/२०२३ रोजी झालेली दुरध्वनी चर्चा.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संचालनालयामार्फत प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी अभियांत्रिकी पदविका तसेच प्रथम वर्ष पोस्ट एच. एस. सी. औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी या विविध अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशाकरीता ऑनलाईन केन्द्रीभुत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून सदर पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची प्रथम वर्ष अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास पदवीका अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचुक व अद्ययावत करण्याबाबत जिल्हानिहाय संस्थांना या कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविलेले होते.

तथापी आपणास असे कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या मार्फत सदर अभ्यासक्रमाची माहीती कन्फर्म करण्याची लिंक उपलब्ध झालेली नसलेने तसेच सदर अभ्यासक्रमाचे माहीती अद्ययावत करण्याचे Module Activate (Updation) करण्याचे काम संचालनालय स्तरावर सुरु आहे. सदर Module Activate (Updation) झाल्यानंतर सर्व संस्थांनी माहीती अद्ययावत करावी. तसेच याअगोदर ज्या संस्थांनी माहीती भरुन लॉक केलेले आहे अश्या संस्थांनी सुध्दा पुनश्चः अतिरीक्त माहीती भरावी.

तसेच सदर अभ्यासक्रमाचे माहीती अद्यावयत करण्याबाबत या कार्यालयामार्फत संदर्भ २ अन्वये दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याबाबत कळविलेले होते त्यांना कळविण्यात येते की, सदर अभ्यासक्रमाचे माहीती अद्ययावत करण्याची तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुबई यांच्यामार्फत देण्यात येणारी लिंक सद्यस्थितीत उपलब्ध झालेली नसल्याने सदर अभ्यासक्रमा चालविणा-या संस्थानी दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी. लिंक उपलब्ध होताच सदर अभ्यासक्रमाची माहीती अद्ययावत करण्याकरीता उपस्थित राहण्याबाबतचे वेळापत्रक आपणास लवकरच कळविण्यात येईल.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.